# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

सिडको भवन, २ रा मजला (दक्षिण कक्ष), बेलापुर, नवी मुंबई- ४००६१४
दुरध्वनी:०२२-२७५७०१६६ /२७५७१६७३फॅक्स:०२२-२७५७०९६९

---

**जा.क्र.मजीप्रा/बदल्या-२०२१/उ.अ./९/आ-१** **दिनांक:- ६.८.२०२१**

// आदेश //

संदर्भ :- सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. एसआरव्ही-२०२१/कार्या-१२,
दिनांक ९.७.२०२१ व दि.२९.७.२०२१

सार्वजनिक सेवेच्या हितार्थ महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामधील कर्मचाऱ्यांचे बदल्यांचे विनियमन २०१३, दिनांक ४.६.२०१४ मधील कलम ६(१) मधील तरतुदीनुसार बदली करण्यास सक्षम असलेल्या प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेने आणि उक्त अधिनियमाच्या कलम ३(१) व ४(१) मधील तरतुदीनुसार खालील उप अभियंता (यां) यांना खालीलप्रमाणे रकाना क्र.४ मध्ये नमुद केलेल्या ठिकाणी बदलीने पदस्थापना देण्यात येत आहे.

| अ. क्र. | उप अभियंता (यां) यांचे नांव | कार्यरत कार्यालयाचे नांव | बदलीनंतर पदस्थापनेच्या कार्यालयाचे नांव | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| | श्री.एस.एन.श्रीखंडे | म.जी.प्रा. (यांत्रिकी) मंडळ, सिडको भवन, नवी मुंबई | म.जी.प्रा. (यांत्रिकी) मंडळ, नागपुर | रिक्तपदी |

श्री.एस.एन.श्रीखंडे, उप अभियंता (यां) यांना सदर पदावर रुजू होण्यासाठी दिनांक ११.८.२०२१ रोजी म.नं. एकतर्फी कार्यमुक्त करण्यात येत आहे. त्यांनी कोणत्याही आदेशाची प्रतिक्षा न करता सदर पदावर तात्काळ रुजू व्हावे.

संदर्भिय शासन निर्णय दि.९.७.२०२१ व दि.२९.७.२०२१ मधील परिच्छेद क्र.९ नुसार महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम-१९८२ मधील नियमानुसार दिलेल्या अनुज्ञेय पदग्रहण अवधीतच, बदली झालेल्या उप अभियंता यांनी बदलीच्या ठिकाणी रूजू होण्याची दक्षता घ्यावी अन्यथा या पदग्रहण अवधीत बदलीच्या पदावर रुजू न झाल्यास, त्यांचा अनपस्थितीचा कालावधी हा अकार्यदिन (Dies -non) म्हणून गणला जाईल.

श्री.एस.एन.श्रीखंडे, उप अभियंता (यां) यांनी पदभार स्विकारल्यानंतर त्याबाबतचा अहवाल मध्यवर्ती कार्यालयास सादर करावा. तसेच त्यांचे लक्ष सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. सीडीआर-१०८२/२५६७/२८/अकरा, दि.३०.८.१९८२ च्या परिपत्रकाकडे वेधण्यात येत आहे. त्यात दिलेल्या सूचना लक्षात घेऊन बदली रद्द करण्यासाठी कुढल्याही स्वरूपाची आवेदने सादर केल्यास ते शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र ठरतील याची त्यांनी नोंद घ्यावी.

श्री.एस.एन.श्रीखंडे, उप अभियंता (यां) यांची बदली प्रशासकीय कारणास्तव असल्याने, त्यांना नियमानुसार पदग्रहण अवधी व बदली प्रवासभत्ता अनुज्ञेय राहील.

DSD 6/8/21

**(दिपाली देशपांडे-सावेडकर)**
मुख्य प्रशासकीय अधिकारी

**प्रत माहितीसाठी सादर.**
मा.मंत्री, पा.पु.व स्व. तथा अध्यक्ष, म.जी.प्रा. यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
मा.राज्यमंत्री, पा.पु.व स्व. तथा उपाध्यक्ष, म.जी.प्रा. यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
मा.अपर मुख्य सचिव, पा.पु.व स्व.विभाग, मंत्रालय, मुंबई
मा.सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, एक्सप्रेस टॉवर्स, मुंबई

**प्रत माहिती व कार्यवाहीसाठी.**
संचालक (वित्त), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको भवन, नवी मुंबई
मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण प्रादेशिक विभाग, नागपुर
अधीक्षक अभियंता (मुख्यालय), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, एक्सप्रेस टॉवर्स, मुंबई
अधीक्षक अभियंता (यां), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नवी मुंबई / नागपूर.
श्री.एस.एन.श्रीखंडे, उप अभियंता (यां) यांना (अधीक्षक अभियंता, म.जी.प्रा. (यां) मंडळ, नवी मुंबई यांचेमार्फत) माहिती व कार्यवाहीसाठी
कार्यालयीन आदेश धारिका